अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आजचा सामना



Vs



राजस्थान रॉयल्स वि.पंजाब किंग्स्

वेळ : ७.३० वा. स्थळ : गुवाहाटी

www.surajyadigital.com । बुधवार, दि. १५ मे २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २२५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२



# सोलापूर रेल्वे स्टेशन बॉम्बने उडवण्याची धमकी

- ७०० किलो आरडीएक्स आणि ५ अतिरेकी
- फोन करणारा रिक्षाचालक मद्यपी ?

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यातील सोलापूरसह सांगली, पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर ही रेल्वे स्थानके बॉम्बस्फोटाने उडवून देण्याच्या धमकीचा फोन एका अज्ञाताकडून सांगली रेल्वे स्थानक कार्यालयात काल सोमवारी रात्री सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास आला होता. धमकीच्या या फोनमुळे सोलापूर रेल्वे स्थानक प्रशासनात काल रात्रीपासून प्रचंड खळबळ माजली. बॉम्बस्फोटाच्या धमकीने लोहमार्ग पोलिसांसह सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय आणि ग्रामीण पोलिस दलाची मोठी पळापळ झाली.

दरम्यान, बॉम्बशोध पथक तसेच श्वान पथकाच्या मार्फत सोलापूर रेल्वे स्थानकाची कसून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान कोणतीही बॉम्बसदृश्य वस्तू सापडली नसल्याचे लोहमार्ग पोलिसांनी आज मंगळवारी (ता.१४) सांगितले. रेल्वे स्थानकात प्रवाशी बॅगांसह अन्य साहित्यांबरोबरच प्रवशांची झाडाझडती घेतली जात असल्याने प्रवाशांमध्ये खळबळ माजली. नेमका प्रकार काय? प्रवाशांची एवढी कसून चौकशी का केली जात आहे, याची माहिती प्रवाशी मिळविण्याचा प्रयत्न करत होते. कसून तपासणीच्या अनुषंगाने, रेल्वे स्थानकावरील प्रवाशी दहशतीच्या सावटाखाली आल्याचे चित्र होते.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर, काही रेल्वे स्थानकांमध्ये मॉकड्रील घेण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.





## अज्ञाताने धमकावताना ‘हे’ सांगितले

सोलापूरसह अन्य काही रेल्वे स्थानके स्फोटाने उडवून देण्याच्या पार्श्वभूमीवर, ज्या अज्ञात व्यक्तीचा फोन आला. त्यांने धमकावताना सांगितले की, ‘मी दहशतवादी आहे. माझ्यासोबत आणखी पाच व्यक्ती आहेत. त्या व्यक्ती मुंबई, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे येथे पोचल्या आहेत. आरडीएक्सने या स्थानकांत स्फोट करणार आहोत, आमच्याकडे ७०० किलो आरडीएक्स आहेत, त्याच्या साहाय्याने आम्ही रेल्वे स्थानके उडविणार आहोत’

## सर्वच यंत्रणा अत्यंत सज्ञ

धमकीचा फोन आल्यानंतर जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांना संदेश देऊन मुख्य रस्त्यांवर नाकाबंदी करण्यात आली. संशयित वाहनांची झडती घेण्यात आली. रुग्णवाहिका, अग्नीशमन यंत्रणा, खासगी व सरकारी रुग्णालये यांना सज्ञ राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. यादरम्यान, बॉम्बशोध पथक तसेच श्वान पथकाच्या मार्फत सोलापूर रेल्वे स्थानकाची कसून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान कोणतीही अनुचित बाब आढळली नाही. या मोहिमेत सोलापुरातील पोलिस अधिकारी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग, दंगलविरोधी पथक, दहशतवादविरोधी पथक आदींनी सहभाग घेतला.

## रेल्वे गाड्यांवर परिणाम नाही

अज्ञाताकडून आलेला धमकीचा फोन आणि त्या पार्श्वभूमीवर तंग बनलेले वातावरण या अनुषंगानं, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील रेल्वे वाहतुकीवर काल आणि आज कोणताही परिणाम झाला नसल्याचे सांगण्यात आले. सर्व रेल्वे गाड्या त्यांच्या निर्धारीत वेळेत धावल्याची माहिती रेल्वेच्या वाणिज्य विभागाकडून देण्यात आली.

## ‘त्या’ मद्यपीचा बोलविता धनी कोण?

सांगलीमधील ज्या रिक्षा चालकाने काही रेल्वे स्थानके उडवून देण्यासंबंधी धमकीचा फोन केला, तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे का? यापूर्वी त्याने असा काही प्रकार केला आहे का? बॉम्बस्फोटाने स्थानके उडवून देण्याची धमकी देण्याचे त्याचे धाडस कसे झाले? त्या रिक्षा चालकाने स्व:ताहून धमकीचा फोन करण्याचे धाडस दाखविले की, त्याला कोणी असा फोन करण्यास भाग पाडले? यासंबंधीची सगळी चौकशी पोलिस करीत आहेत. चौकशीतून या घटनेचे कोडं उलगडणार आहे.

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

रेल्वे स्थानके बॉम्बस्फोटाने उडविण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरु आहे. विशेष तपासणी यंत्रणेकडून तपासाची सुत्रे अधिक गतीने हलविण्यात आली असून धमकी देणाऱ्या अज्ञाताच्या मुसक्या आवळल्या जातील, संबंधित अज्ञातास ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणाचा नेमकेपणानं उलगडा होईल. दरम्यान रेल्वे प्रवाशांनी कोणत्याही दहशतीच्या सावटाखाली वावरु नये. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे रेल्वे विभागाच्या पोलिसांनी आज मंगळवारी सांगितले.

## पोलीसांचा डोळ्यात तेल घालून पहारा

राज्यातील काही रेल्वे स्थानके आरडीएक्सनं उडवून देण्याच्या अज्ञाताच्या फोनच्या पार्श्वभूमीवर, सर्व लोहमार्ग पोलिसांना अलर्ट राहण्याच्या सुचना देण्यात आल्या. पोलिसांनी डोळ्यात तेल घालून सोलापूर रेल्वे स्थानकासह परिसरात खडा पहारा ठेवला आहे. सोलापूर रेल्वे स्थानकावर बंदोबस्त कसा लावला आहे? याबाबत माहिती देताना लोहमार्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष गायकवाड म्हणाले की, सोलापूर रेल्वे स्टेशनवर लोहमार्ग पोलिस ठाण्याचे दोन अधिकारी व १५ पोलिस कर्मचारी, आरपीएफचे दोन पोलिस अधिकारी व १५ कर्मचारी तसेच पोलिस आयुक्तालयाकडील सदर बझार पोलिस ठाण्याचे दोन अधिकारी व १५ कर्मचारी हे रेल्वे स्टेशनवर बंदोबस्तास आहेत. तसेच या पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसराची श्वान पथकाव्दारे तपासणी केली. तसेच रेल्वे स्टेशनमध्ये येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांची कसून चौकशी केली.

## मद्यपी रिक्षा चालकाने फोन केला अन् उडाली प्रचंड खळबळ

राज्यातील काही रेल्वे स्थानके बॉम्बस्फोटाने उडवून देण्याच्या पार्श्वभूमीवर, जो धमकीचा फोन सांगली रेल्वे स्थानकाला आहे, तो सांगलीमधील एका मद्यपी रिक्षा चालकाने केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. संबंधित रिक्षा चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले असून या घटनेच्या पार्श्वभूमीवर, त्याचा कसून तपास करण्यात येत असल्याचे लोहमार्ग पोलिस सुत्रांकडून सांगण्यात आले. या प्रकरणी संबंधित रिक्षा चालकाच्या विरोध्दात सांगली पोलिस ठाण्यात गुन्हादेखील दाखल करण्यात आल्याचेही लोहमार्ग पोलिसांनी सांगितले.

## १० लाखांसाठी विवाहितेचा छळ पतीसह सातजणांविरूध्द गुन्हा

✔ **सोलापूर** : जुन्या कार खरेदी-विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी रूकैय्या शेख या विवाहितेला माहेरून १० लाख रूपये घेवून म्हणून तिचा शारिरींक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती अब्दुल शेख, सासरा अ. सत्तार शेख, सासू मरियम शेख, मोठा दिर अ. गफार शेख, दिर शोएब शेख, असिफ शेख, शफी शेख सर्व रा. सय्यद नगर, हडपसर, पुणे या ७ जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी रूकैय्या शेख (वय २४ रा. सहारा नगर भाग-३) या विवाहितेने विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

रूकैय्याचे अब्दुल शेखबरोबर लग्न झाल्यानंतर डिसेंबर २०१८ ते डिसेंबर २०20 या दरम्यान रूकैय्या ही सासरी नांदत असताना तिचा पती व सासरच्या लोकांनी तिला माहेरून १० लाख रूपये आण नाहीतर तुला नांदविणार नाही असे म्हणून तिचा शारिरींक व मानसिक छळ केला.

रूकैय्याच्या फिर्यादीवरून पतीसह सासरच्या ७ जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास हवालदार बहिर्जे हे करित आहेत.

## वृद्धेच्या गळ्यातील बोरमाळ लंपास

**सांगोला येथील घटना**

✔ **सांगोला** : एसटी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी वृद्ध महिलेच्या गळ्यातील ३० हजारांची एक तोळे सोन्याची बोरमाळ लंपास केली. ही घटना मंगळवारी दुपारी १२ च्या सुमारास सांगोला बस स्थानकावर घडली. याबाबत, राधाबाई रखमाजी बजबळकर (रा. जुनोनी, ता. सांगोला) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. राधाबाई बजबळकर आणि त्यांच्या सासू चंद्राबाई बजबळकर व नणंद कल्पना हिप्परकर अशा तिघी मिळून मंगळवारी सकाळी १० वाजता सांगोला तालुक्यात जुनोनी येथून निघाल्या. महूदला जाण्यासाठी सांगोला बसस्थानकावर आल्या होत्या. त्या दरम्यान दुपारी १२ च्या सुमारास सांगोला-अकलूज एसटी बस लागल्याने महूदला जाण्यासाठी सून राधाबाई व नणंद कल्पना हिप्परकर एसटीत अगोदर चढल्या. पाठीमागून वृद्ध चंद्राबाई चढत असताना गर्दीत चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील बोरमाळ लंपास केली. हा प्रकार चंद्राबाई यांच्या लक्षात येताच त्यांनी सुनेला सांगितले. इतक्यात वृद्धेने आरडाओरड केल्यामुळे चालकाने एसटी बस थेट सांगोला पोलिस स्टेशनला आणून पोलिसांना घडला प्रकार सांगितला. यावेळी महिला पोलिस कर्मचारी यांनी महिला प्रवाशांची व पोलिसांनी पुरुषांची झाडाझडती घेतली. मात्र, बोरमाळ मिळून आली नाही.

## बचत गटात साडेतीन लाखांचा अपहार

**अक्कलकोटला तिघांविरुद्ध गुन्हा**

✔ **सोलापूर** : बचत गटाची रक्कम वसूल करून ती फायनान्स मध्ये जमा न करता ३ लाख ५९ हजार ६७५ रुपयांचा अपहार केल्याची घटना अक्कलकोट येथील भारत फायनान्शियल येथे घडली. या प्रकरणात अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी तिघा विरुद्ध अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात नागनाथ गुरप्पा चाबुकेश्वर (रा. कुंभारी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी अभिषेक रामेश्वर हुल्ले, साहेबलाल चांद मुल्ला आणि दिनेश परशुराम चलवादी (तिघे रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला . अक्कलकोट येथील समता नगरात भारत फायनान्शिअलची शाखा आहे गावातील बचत गटाचे हप्ते वसुली करून ती रक्कम या फायनान्स मध्ये जमा करण्याचे काम वरील आरोपी करीत होते . त्या तिघांनी मिळून ऑक्टोबर २०२२ ते फेब्रुवारी२०२४ या दरम्यान बचत गटाचे हप्ते वसूल केले. जमा झालेली ३ लाख ५९ हजार ६७५ रुपयांच्या रकमेचा अपहार केला. तपास फौजदार खापरे करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हाऊसफुल्ल! सध्या ‘कोंबिंग’ ऑपरेशन सुरू आहे!

| कल्याण |
| --- |
| 149-40-569 |

| मुंबई |
| --- |
| 117-98-260 |

## प्रधानसेवकाची संपत्ती

# ना स्वत:चे घर, ना कार, स्वत:कडे केवळ ५२ हजार

✔ **वाराणसी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी वाराणसी लोकसभा मतदार संघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मोदी हे तिसऱ्यांदा येथून निवडणूक लढवत आहेत. ते विजयाची हॅट्ट्रिक करणार काय,याकडे साऱ्या देशाचे लक्ष लागून आहे. उमेदवारी अर्जासह मोदींनी त्यांचे प्रतिज्ञापत्रदेखील सादर केले आहे, ज्यामध्ये त्यांच्या संपत्तीविषयीची माहिती देण्यात आली आहे.त्यानुसार मोदींकडे स्वत: चे घर नाही. तसेच त्यांच्या नावावर कोणतेही चारचाकि वाहन नाही.त्यांच्याकडे एकूण ५२,९२० रुपयांची रोकड आहे.

गांधीनगरमधील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत त्यांचे खाते असून या त्यात ७३,३०४ रुपये आहेत तसेच भारतीय स्टेट बँकेच्या वाराणसी शाखेतही त्यांचे खाते असून त्यात केवळ ७,००० रुपये आहेत. मोदींच्या प्रतिज्ञापत्रात गेल्या पाच वर्षांमधील प्राप्तीकर परतावा विवरण उपलब्ध आहे. त्यानुसार त्यांनी २०१८-१९ मध्ये त्यांची संपत्ती ११ लाख १४ हजार २३० रुपये दाखवली होती. तर २०१९ मध्ये त्यांच्याकडे १७ लाख २० हजार ७६० रुपये, २०20-२१ मध्ये त्यांच्याकडे १७ लाख ०७ हजार ९३० रुपये, २०२१-२२ मध्ये १५ लाख ४१ हजार ८७० रुपये, तर २०२२-२३ मध्ये त्यांच्याकडे २३ लाख ५६ हजार ०८० रुपये इतकि संपत्ती दाखवण्यात आली आहे. अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांनी गंगा पूजन करत वाराणसीशी असलेल्या गेल्या १० वर्षांच्या ऋणानुबंधांना उजाळा दिला. यावेळी ते म्हणाले, गंगा मातेने मला दत्तक घेतले आहे. काशीबाबतचे ऋणानुबंद सांगताना मोदी भावूक झाले होते. यावेळी मोदी म्हणाले, लोकांचे माझ्यावरील प्रेम पाहून माझ्या जबाबदाऱ्या दिवसेंदिवस आणखी वाढत असल्याची मला जाणीव होते.



### मुख्यमंत्री शिंदेंची उपस्थिती

दरम्यान, पंतप्रधान मोदींनी उमेदवारी अर्ज दाखल केला तेव्हा वाराणसीमध्ये एनडीएम धील दिग्गज नेत्यांची उपस्थिती होती. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यासह भाजपाचे अनेक नेते यावेळी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर

१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३



पाहिजेत

- **मुख्य उपसंपादक** : पद १
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्रातील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव
  - सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, आर्थिक ज्ञान
- **उपसंपादक** : पद २
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव
- **शहर वार्ताहर** : पद ४
  - सोलापूर शहरातील सामाजिक, राजकीय ज्ञान
  - बिटवरील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव
- **सहाय्यक जाहिरात व्यवस्थापक** : पद २
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्र जाहिरात विभागातील कामाचा ५ वर्षाचा अनुभव
- **मार्केटींग एक्झिक्युटीव्ह (जाहिरात)** : पद ३
  - किमान पदवीधर
  - मार्केटींग क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव
  - वृत्तपत्र क्षेत्रातील जाहिरात विभागातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य
- **ऑफीस बॉय** : पद ३
  - किमान १० वी उत्तीर्ण

खालील पत्त्यावर ८ दिवसात अर्ज करावेत.
Email : pmitragotri999@gmail.com
Whatsapp No. 8975768348